# सातारा जिल्हा परिषद,सातारा (कृषि विभाग)

श्री विजय माईनकर
कृषि विकास अधिकारी
सातारा जिल्हा परिषद,सातारा

दुरध्वनी क्रमांक :- 02162-234186
Email: adozpsatara@gmail.com

जा.क्र.कृषि/तंत्र-1 /अभ्यास दौरा/2024-25 / 291 /2024 दिनांक, 07/06/2024

**जाहीर कोटेशन नोटीस**

**विषय :- शेतकरी व अधिकारी यांचेसाठी अभ्यास दौ-याकरीता टूर पॅकेज बाबत एकत्रित दरपत्रक देणेबाबत.**

सातारा जिल्हयातील शेतकरी व जिल्हा परिषदेच्या कृषि विभागातील कृषि अधिकारी व विस्तार अधिकारी(कृषि) यांचे साठी सन 2024-25 या वित्तीय वर्षामध्ये बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी येथे दोन दिवसांचा अभ्यास दौ-याचे आयोजन केले जाणार आहे. तरी सदर अभ्यास दौ-याचे टूर पॅकेज करीता नोंदणीकृत/मान्यताप्राप्त टूर्स अ‍ॅण्ड ट्रॅव्हल्स कंपनी/ संस्थांकडून मोहोरबंद लिफाफयातून विहीत नमुन्यात दरपत्रक मागविण्यात येत आहे. सदरची दरपत्रके दि.07/06/2024 ते दि.18/06/2024 या कालावधीत शासकीय सुटटी सोडून दुपारी 2.00 वाजेपर्यंत समक्ष अथवा पोष्टाने पोहोच होतील अशा बेताने सादर करावीत. सदरचे दरपत्रक कृषि विकास अधिकारी,जिल्हा परिषद सातारा,3 रा मजला कृषि विभाग या पत्त्यावर पोहोच करावीत. विहीत मुदतीत व वेळेत प्राप्त होणारी दरपत्रके स्विकारली जातील, तदनंतर प्राप्त होणारी दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**दरपत्रकाचा विहीत नमुना**

| अ.क्र. | अभ्यास दौ-याचे ठिकाण | तपशिल | एकत्रित प्रति व्यक्ती / पॅकेज दर (सर्व करांसहित) |
|---|---|---|---|
| 1 | बाळासहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी (महाराष्ट्र) | 1)सातारा जिल्हा परिषद,सातारा ते बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली जि.रत्नागिरी येथे दोन दिवस प्रवास (1 दिवस दापोली येथे विद्यापीठामध्ये मुक्काम) तसेच स्थानिक प्रवास<br>2)दौ-यामध्ये 1 दिवसाच्या मुक्कामाच्या बाबतीत दापोली येथिल विद्यापीठामधील शेतकरी निवास येथे निवास व्यवस्था करणे<br>3) प्रति व्यक्ती दौरा कालावधीतील आवश्यक चहा/बिस्कीट संख्या -4, नाश्ता संख्या- 2, दुपारचे व सायंकाळचे भोजन संख्या -4, मिनरल पाणी बॉटल (1 ली)संख्या - 4<br>4)दौ-यामध्ये सहभागी व्यक्ती संख्या - 60 | |

## अटी व शर्ती

1) प्राप्त दरपत्रके दि.18/06/2024 रोजी दुपारी 4.00 वा उपस्थित पुरवठादारांचे समक्ष उघडणेत येतिल.
2) कृषि विद्यापीठातील निवास व भोजन सेवा लक्षात घेता या दोन दिवसांच्या अभ्यास दौ-यासाठी प्रति व्यक्ती रू.1750/- प्रति दिन याप्रमाणे अंदाजीत खर्च गृहित धरून दोन दिवसांसाठी रू.3500/- प्रति व्यक्ती अनुदान मर्यादेच्या अधिन राहून पुरवठादारांनी सर्व करांसहित दरपत्रके सादर करावयाची आहेत.
3) सदर अभ्यास दौ-यांचे दोन टप्पे केले जाणार असून पहिल्या टप्प्यातील अभ्यास दौ-याचे आयोजन दि.20/6/2024 ते 21/6/2024 या कालावधीत केले जाणार आहे तर दुस-या टप्प्यातील दौ-याचे आयोजन कार्यालयाच्या सोईनुसार केले जाईल. प्रत्येक अभ्यास दौ-यातील सहभागी व्यक्तींची संख्या 60 इतकी राहील.
4) सदर अभ्यास दौ-यांतर्गत बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील मुक्कामासाठी निवासाची सुविधा नाममात्र दरामध्ये उपलब्ध होत आहे तथापी सदर निवास व्यवस्थेसाठी पुरवठादारांनी स्वतः विद्यापीठाकडे बुकिंग करणेचे आहे.
5) सदरची दरपत्रके दोन लखोटा पध्दतीने सादर करणेची आहेत.

अ) **तांत्रिक लखोटा (लखोटा क्रमांक 1)** – सदर लखोटयामध्ये पुरवठादारांनी खालील कगदपत्रे सादर करावयाची आहेत.

1. संस्था नोंदणीकृत व मान्यताप्राप्त असले बाबतचा सक्षम प्राधिकरणाचा (शॉप ॲक्ट) दाखला/प्रमाणपत्र
2. सन 2021-22, सन 2022-23 व सन 2023-24 या वर्षाची आयकर विवरणपत्रे
3. दरपत्रके सादर करणा-या मान्यताप्राप्त / नोंदणीकृत टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स संस्थांनी त्यांनी, त्यांचेमार्फत आयोजित केलेल्या शासकीय अभ्यास दौ-याबाबतचा किंवा शासकीय कार्यक्रमांस प्रतिनिधी उपस्थित ठेवणेबाबत केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने अनुभवाचे प्रमाणपत्र.
4. या अभ्यास दौ-यांसाठी एकूण 60 व्यक्तींचा सहभाग असल्याने इतक्या आसनक्षमतेची सुस्थितीतील प्रवासी वाहतूक परवाना नोंदणी असलेल्या वाहनांचा परवाना व त्याचा विमा नोंदणी बाबतचे प्रमाणपत्र.
5. अभ्यास दौ-यामध्ये संपुर्ण प्रवासाकरीता वापरण्यात योणा-या वाहनाच्या पथकर, पार्कीग कर तसेच ऐनवेळी सदरचे वाहन नादुरूस्त झाल्यास, त्याऐवजी तातडीने दस-या वाहनाची व्यवस्था करणे दरपत्रक सादर करणा-या दुसै ॲण्ड ट्रॅव्हल्स कंपनीवर बंधनकारक राहील याबाबातचे दरपत्रकधारकाचे हमीपत्र.
6. तांत्रिक लाखोटयातील नमुद सर्व कागदपत्रे सादर करणा-या पात्र पुरवठादारांचाच व्यापारी लखोटा म्हणजेच लखोटा क्रमांक -2 उघडण्यात येईल.

**ब) व्यापारी लखोटा (लखोटा क्रमांक 2)** – सदर लखोटयामध्ये खालील कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

दौ-यांबाबत दरपत्रकाच्या देण्यात आलेल्या विहित नमुन्यात एकत्रित प्रति व्यक्ती/पॅकेज दर(सर्व करांसहित) व पुरवठादाराचे स्वाक्षरी व शिक्क्यासह सादर करावे.

क) **दौ-यासंबंधी विशेष अटी व शर्ती :-**

1. दौ-यामध्ये एकूण 60 व्यक्तींचा समावेश असून बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचे मार्फत शेतकरी निवास व्यवस्था माफक दरामध्ये उपलब्ध होत असल्याने दौ-यातील व्यक्तींसाठी सदर ठिकाणी आपण संपर्क करून निवासाची व्यवस्था करावी. महिला प्रतिनिधींची मुक्कामाची सोय स्वतंत्र खोलीमध्ये करण्यात यावी.
2. अभ्यास दौ-यामध्ये समाविष्ट प्रतिनिधी यांना चहा-पाणी, नाश्ता, भोजन उत्तम प्रतिची व्यवस्था करावी.
3. अभ्यास दौ-याकरीता दरपत्रके मागविण्याबाबतची जाहीर नोटीस जिल्हा परिषद नोटीस बोर्ड तळमजला व सातारा जिल्हा परिषदेच्या www.zpsatara.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.
4. नोंदणीकृत / मान्यताप्राप्त अुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स कंपनीने त्यांचे लखोटे (लखोटा क्र.1 व 2) दि. दि.07/06/2024 ते दि.18/06/2024 या कालावधीत शासकीय सुटटी सोडून दुपारी 2.00 वाजेपर्यंत सादर करावेत. प्राप्त दरपत्रके दि.18/06/2024 रोजी दुपारी 4.00 वा उपस्थित पुरवठादारांचे समक्ष उघडणेत येतिल व पात्र पुरवठादरास वाटाघाटी नंतर मंजूर दरानुसार पुरवठादारास कार्यरंभ आदेश देण्यात येईल.
5. नैसर्गिक आपत्ती अथवा काही अपरिहार्य कारणामुळे अभ्यास दौ-याचे तारखेमध्ये बदल झाल्यास तसे पुरवठादारास अवगत करण्यात येईल व सदर बदल पुरवठादारास बंधनकारक राहील.
6. अपुर्ण व खोटी अथवा चुकीची माहिती सादर केलेल्या पुरवठादाराच्या बाबतीत निविदा प्रक्रीया कोणत्याही टप्प्यावर रद्द्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
7. अभ्यास दौ-याकरीता प्राप्त दरपत्रके / निविदा प्रक्रीया कोणेतही कारण न देता, कोणत्याही टप्प्यावर रदद करण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा यांनी राखून ठेवलेला आहे व याबाबत कोणतेही स्पष्टीकरण मागता येणार नाही.

(विजय माईनकर)
कृषि विकास अधिकारी
सातारा जिल्हा परिषद,सातारा

प्रति, ------------------------------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------

प्रत :- नोटीस बोर्ड, सातारा जिल्हा परिषद सातारा प्रसिध्दीसाठी
प्रत:- आयटी सेल, सातारा जिल्हा परिषद सातारा प्रसिध्दीसाठी